# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-16.06.2026** **वार- मंगळवार**

---

**पेयजलधोरण**

राज्यातील ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर प्रभावी पद्धतीनं आणि कायमस्वरुपी उपाययोजनांवर भर देणारं महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ जाहीर करण्यात आलं आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. या धोरणाच्या माध्यमातून ग्रामीण पेयजल योजनांचा शाश्वत विकास केला जाणार असून विविध योजनांचे एकत्रिकरण करून हे धोरण राबविण्यात येणार आहे. स्वच्छ, निर्जंतुक तसंच दर्जेदार पाणी पुरवठा व्हावा यासाठीचं नियोजन या धोरणात असून योजना चांगल्या रितीनं राबविण्यासाठी दीर्घकालीन नियोजन केलं जाणार आहे.

**कफसिरप**

केंद्र सरकारनं देशभरातील औषध विक्रीच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करत लहान गावांमध्ये कफ सिरप विक्रीसाठी उपलब्ध असलेली विशेष सवलत रद्द केली आहे. कफ सिरपच्या वापरावर अधिक प्रभावी देखरेख ठेवणे, संभाव्य गैरवापराला आळा घालणे आणि सार्वजनिक आरोग्य आणि सुरक्षेला बळकटी देणे हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**नीलम गोऱ्हे**

महिलांच्या कायदेनिर्मितीतील आणि समाजपरिवर्तनातील योगदानाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचला पाहिजे, असं प्रतिपादन शिवसेना नेत्या आणि  विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काल केलं. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित शं. ना. जोशी पुरस्कार ‘कायदा निर्मितीमध्ये महिलांचे योगदान’ या पुस्तकाच्या लेखिका विद्या देवधर डॉ. गोऱ्हे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी मसापचे  अध्यक्ष योगेश सोमण यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. राज्य सरकारच्या वतीने लवकरच एकल महिला धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहितीही डॉ. गोऱ्हे यांनी दिली. पुणेकरांच्या सुरक्षेसाठी ‘सुरक्षित व दक्ष पुणे’ हे व्यासपीठ सुरू करण्याचा विचार असल्याचं गोऱ्हे यांनी सांगितले.

**सर्वेक्षण**

महाराष्ट्र शासनाच्या अर्थ आणि सांख्यिकी आयुक्तालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या नियतकालिक श्रमशक्ती सर्वेक्षण म्हणजे PLFS आणि असंघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांचे वार्षिक सर्वेक्षण म्हणजे ASUSE ला  पुणे जिल्ह्यात कालपासून सुरुवात झाली आहे. या सर्वेक्षणाचा शुभारंभ जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आला.

या सर्वेक्षणातून रोजगार, बेरोजगारी, श्रमशक्ती सहभाग दर, स्वयंरोजगार, तसेच लघु आणि असंघटित क्षेत्रातील उद्योग-व्यवसायांची स्थिती याबाबत महत्त्वपूर्ण आकडेवारी संकलित केली जाणार आहे. ही माहिती जिल्हास्तरीय विकास आराखडे तयार करणे, रोजगार धोरणे ठरवणे, उद्योग आणि गुंतवणुकीला चालना देणे तसंच राज्य आणि देशाच्या आर्थिक विकासाचं अचूक चित्र समोर आणण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे प्रशासनानं स्पष्ट केलं आहे.

**<u>आर.आर.आर.केंद्र</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'आर.आर.आर. (रिड्यूस, रियूज, रिसायकल)' संकलन मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, गेल्या एका महिन्यात शहरातील विविध भागांतून ४५३ वस्तूंचं संकलन करण्यात आले आहे. या वस्तूंचे एकूण वजन सुमारे ६२८ किलो असून, यामध्ये खेळणी, पुस्तके, कपडे, इलेक्ट्रॉनिक साहित्य तसेच विविध घरगुती वस्तूंचा समावेश आहे. पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासाच्या दिशेनं हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं आयुक्त डॉक्टर विजय सूर्यवंशी यांनी सांगितलं. नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून 'कचऱ्यातून संसाधन' निर्माण करण्याच्या संकल्पनेला बळ द्यावं असं आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केलं आहे.

**<u>सेट-परीक्षानिवेदन</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महाराष्ट्र आणि गोवा राज्यात येत्या २६ जुलै रोजी एक्केचाळीसाव्या सेट परीक्षेचं आयोजन करण्यात आलं आहे . या परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत, विना विलंब शुल्क, १७ ते २६ जून अशी वाढविण्यात आली आहे, तर विलंब शुल्कासह मुदत दिनांक २७ ते ३० जून अशी वाढविण्यात आली आहे. ऑनलाईन अर्जात चुकीची माहिती भरली असल्यास ती दुरुस्त करण्यासाठीचा कालावधी दिनांक १ जुलै ते ३ जुलै असा ठेवण्यात आला आहे.

**<u>कौशल्य विकास</u>**

कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे सामान्यजनांच्या जीवनात आमूलाग्र बदल होत असून युवापिढीसाठी कौशल्य विकास प्रशिक्षणामुळे करिअरच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत, असं मत पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका आणि मॉडर्न कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉक्टर निवेदिता एकबोटे यांनी व्यक्त केलं. यशस्वी एकेडमी फॉर स्किल संस्थेतील संतमाई स्किल डेव्हलपमेन्ट सेंटरमधून विविध कौशल्य विकास प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या प्रमाणपत्र प्रदान सोहळ्यात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या आज बोलत होत्या.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३५ पूर्णांक 9 दशांश तर किमान २3 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**